ISSN 2231-6671

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Hi-TECH
## RESEARCH ANALYSIS

Hi-Tech Research
Analysis

EDITOR IN CHIEF
DR. BALAJI KAMBLE

Issue : XXIII, Vol. V
HI-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.20
ISSN 2231- 6671
Aug. 2021 To Jan. 2022

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Nodal anatomy of two Lantana species in Verbenaceae<br>**Govind P. Shendge** | 1 |
| 2 | Irrigational, Livestock and Agricultural Implements of Selected Villages in Beed District (MS) India<br>**Dr. V. L. Phad** | 6 |
| 3 | Urban Structure of Pusad City in Yavatmal District (Maharashtra State)<br>**Dr. Shivanand S. Kumar** | 13 |
| 4 | E-resources in Veterinary Library & Information Centre: A Roadmap to Meet Emerging Challenges in 21st Century<br>**Ratna Palkar** | 19 |
| 5 | Impact Of Yoga Asanas On Human Body<br>**Dr. Ashok Waghmare** | 24 |
| 6 | भारत में लोक साहित्य का उद्भव और विकास<br>**डॉ. जयंतीलाल बी. बारीस** | 31 |
| 7 | प्रयोजनमूलक हिंदी के प्रयुक्ति क्षेत्र<br>**डॉ. अर्जुन पवार** | 38 |
| 8 | स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विषयक विचार<br>**डॉ. अलका अनिल मानकर** | 43 |
| 9 | धर्माची संकल्पना आणि विविध धर्मांच्या तत्त्वज्ञानाचे मानवाची उन्नती आणि राष्ट्रीय एकात्मता प्राप्तीतील योगदान<br>**डॉ. विठ्ठल गोपाळराव घोनशेटवाड** | 47 |
| 10 | लातूर जिल्हयाचा ऐतिहासिक अभ्यास<br>**कमलाकर श्रीमंतराव मोटे** | 53 |
| 11 | आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत विद्यार्थीनीचा सहभाग व पालकांच्या अभिवृत्तीचा चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. प्रविण प्रकाशराव दिग्रसकर** | 59 |

8

# स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विषयक विचार

**डॉ. अलका अनिल मानकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय,
नांदुरा रेल्वे, जि. बुलडाणा.

## Research Paper - Economics

शिक्षण विषयक विचार मांडतांना स्वामी विवेकानंद म्हणतात...ज्या व्यवस्थेद्वारा संस्कृती, सभ्यता, जीवनमूल्य आणि पूर्वापार संचित ज्ञान नव्या पिढीपर्यंत पोचले जाते त्या प्रणालीला शिक्षण असे म्हणतात. भारतात प्राचीन व्यवस्था अत्यंत उन्नत होती. तेथे तक्षशिला, नालंदा इत्यादी विद्यापीठ विश्वविख्यात होती व त्यात अनेक देशांमधून विद्यार्थी शिकायला येत असत. परंतु बारा शतकापूर्वी झालेल्या सामाजिक आणि राजकीय उलथापालथीमुळे भारतातील शिक्षणप्रणाली प्राय: संपुष्टातआली. ज्या देशात साऱ्या जगामधून विद्यार्थी शिकायला येत असत त्या देशाची शिक्षण प्रणाली अशाप्रकारे नष्ट झाली. ब्रिटीश शासनाच्या काळात इंग्रजांनी आपली सत्ता टिकवून ठेवण्याच्या अट्टाहासापायी नोकर निर्माण करणाऱ्या विशेष शिक्षण प्रणालीचा पुरस्कार केला. स्वामी विवेकानंदांनी संपूर्ण भारताचे आणि साऱ्या जगाचे अवलोकन करून "भारताच्या उद्धाराचा एक मात्र उपाय म्हणजे पुरातन शिक्षण पद्धतीचा पुनरुध्दार करणे होय." असे ठामपणे सांगितले. त्यांनी शिक्षणविषयक अनेक सुत्रे दिली. त्याच्या आधारे सद्यपरिस्थितीत आवश्यक अशा शिक्षण प्रणालीचा अवलंब केल्यास देशाचा व समाजाचा विकास होऊ शकतो.

प्रत्येक राष्ट्राच्या घडणीमध्ये शिक्षणाचे महत्वपूर्ण स्थान आहे. जे राष्ट्र जेवढे शिक्षित तेवढेच ते सर्व क्षेत्रांमध्ये शक्तिसंचय करुन जगामध्ये गौरवपूर्ण स्थान प्राप्त करण्यास समर्थ झाले आहे. आदर्श शिक्षण आणि त्याच्या उद्देशासंबंधी स्वामीजींनी म्हटले आहे. 'Education is manifestation of the perfection already in man' (शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीचेच विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण) खरे शिक्षण

तेच की जे मनुष्यमात्राचे अज्ञान—आवरण दूर करुन त्याच्या पूर्णत्व विकासाला साहयभूत ठरेल. हया दृष्टिकोनातून बधिल्यास आपल्या लक्षात येईल की स्वामीजींचे शिक्षणविषयक मत भारतीय आध्यात्मिक आदर्शापासून वेगळे नाही.

एखाद्या देशाला जींवत रहावयाचे असेल, जगाच्या खांदयाला खांदा भिडवून चालावयाचे असेल, तर त्याला बाहय जगासोबत संबंध तोडून फक्त आपल्या निमित्त घे-यात बसून चालणार नाही. स्वामीजींनी पाश्चात्य संस्कृतीचे अध्ययन करुन पाहिले होते की भारताच्या राष्ट्रीय जीवनाच्या विकासाकरिता पाश्चात्यांच्या भौतिकशास्त्र विषयक ज्ञान—भांडारातून भारताला काही ग्रहण करावे लागेल. म्हणूनच त्यांनी भारताच्या सर्वांगीण कल्याणासाठी प्राच्य आणि पाश्चात्य— 'वेदांत आणि विज्ञान' यांचा समन्वय करण्याची इच्छा प्रकट केली. मनुष्याच्या अंतरी जर ज्ञान आणि शक्तीचा अनंत स्त्रोत विद्यमान नसता, तर हजोंरो प्रयत्न करुन सुध्दा तो ज्ञानी अथवा शक्तिमान होऊ शकला नसता. धुळीत रांगणारी यः कश्चित मुंगी म्हणा की स्वर्गात बसणारी सर्वश्रेष्ठ देवता म्हणा, प्रत्येकाच्याच अंतरी अनंत ज्ञानाचे अगमस्थान विद्यमान आहे. हे ज्ञान माणसात मूलतःच अव्यक्त स्वरुपात अवस्थि असते. ज्ञान कोणतेच बाहेरुन येत नाही, सारे आतच असते, आपण ज्याला माणूस जाणतो असे म्हणतो, ते अगदी मानसशास्त्राच्या रेखीव भाषेतच मांडावयाचे झाल्यास तो शोधून काढतो अथवा अनाकृत करतो असेच म्हणावे लागेल. माणूस जे काही शिकतो ते वस्तुतः अनादृतच करत असतो अनावृत करणे म्हणजे अनंत ज्ञानाची राखण असा जो स्वतःचा आत्मा त्यावरुन एक आवरण वा एक पडदा दूर सारुण टाकणे.

भारतात आपल्या मार्गात दोन मोठे अडथळे आहेत. याबाबतीत इकडे आड तिकडे विहीर अशी अपली स्थिती आहे. एकिकडे जुना सनातनीपणा आणि दुसरीकडे आधुनिक युरोपीय सभ्यता. हया दोहोतून मी पाश्चात्य पध्दती वा साहेबीपणा टाकून जुना सनातनीपणाच निवडीन, हया दोहोत मला पसंत आहे. कारण जुन्या वळणाचा सनातनी हिंदू कदाचित अडाणी असेल अंधविश्वासी असेल, ओबड धोबड असेल, पण तो माणूस असतो. त्याच्या ठायी एक विश्वास असतो. उलट हया साहेब बनलेल्या रोजश्रींना मुळी काही कणाच नसतो. कुठुनतरी कशातरी उचललेल्या तऱ्हतऱ्हेच्या कल्पनांचे तो एक गाबाळ असतो. त्यांचा मिलाफ झालेला नसतो, त्या त्याने आत्मसात करुन घेतलेल्या नसतात. त्या त्याला नीट पचलेल्या नसतात. सारी नुसती खिचडी झालेली असते. तो स्वतःच्या पायावर उभा राहू शकत नाही. त्याचे डोके सारखे गरगरत असते. आमची ती जुनी सनातनी मंडळी कशी माणसे होती, मर्द होती. ते लोक से

करारी अन् खंबीर होते. परंतु तोल सुटलेल्या हया जिवांची, बिचाऱ्यांची अजूनच नीट घडणच व्हावयाची आहे. त्यांना अजूनच कोणताही घाट आलेला नाही. हया धुकाळ व्यक्तित्वाच्या जीवांना पुरुष म्हणायचे, की स्त्री म्हणायचे, म्हणून आपले ध्येय पुढीलप्रमाणे आहे:आपल्या देशाचे अध्यात्मिक व ऐहिक असे दोन्ही प्रकारचे शिक्षण आपण आपल्या हाती घेतले पाहिजे व ते आपल्याच राष्ट्रीय पद्धतीनुसार दिले पाहिजे.

आपल्याला जीवन घडविणारे, माणूस निर्माण करणारे, चारित्र्य घडविणारे व चांगले विचार आत्मसात करविणारे शिक्षण हवे आहे. चार—पाच विचार चांगले आत्मसात करून आपल्या जीवनात व आचरणात उतरलेत तर अवघ्या ग्रंथालय मुखोद्गत करणाऱ्या व्यक्ती पेक्षाही तुमचे शिक्षण सरसच ठरेल.

**यथा खरश्चन्दनभारवाही भारस्य न वेत्ता न तु चंदनस्या**

**चंदनकाळे वाहणाऱ्या गाढवाला ओझ्याचीच जाणीव होत असते, चंदनाच्या गुणांची नव्हे,**

विदेशांच्या निमंत्रणाशिवाय स्वतंत्र बुध्दीने आपल्या प्राचीन ज्ञानशाखांचा अभ्यास आज व्हायला पाहिजे. त्यासोबतच इंग्रजी भाषा व पाश्चिमात्य विज्ञान यांचाही अभ्यास झाला पाहिजे. आपल्या येथे उद्योगधंदे वाढ होण्याच्या दृष्टीने आवश्यक ते सगळे तांत्रिक व अन्य शिक्षण आपण घेतले पाहिजे. तसे झाले तर आपणास नोकऱ्यांच्या मागे फिरावे लागणार नाही. ज्या शिक्षणाने माणूस जीवनात आपल्या पायावर उभा राहू शकतो तेच खरे शिक्षण. सध्याच्या शिक्षणाने फक्त बाहय राहणीच बदलली पण कल्पकता आणि शोधक प्रतिभा यांच्या अभावी अर्थोत्पादनाचे अन्य उपाय काही गवसत नाही. उच्च शिक्षण काय भौतिक शास्त्राच्या अभ्यासापुरते आणि यंत्राद्वारा नित्यापयोगी वस्तूंच्या निर्मितीपुरतेच सिमीत मानायचे ! उच्च शिक्षणाचा खरा उपयोग जीवनाती समस्या सोडविता येण्यात आहे. हे कसे घडवून आणायचे याच प्रश्नाचा विचार आज आधुनिक सभ्य जगतात चालला आहे. आपल्या देशात हा विचार हजारो वर्षापूर्वीच सोडविला होता.

लहान मुलांना शिक्षण देताना त्यांच्यावर आपला पुरेपूर विश्वास असला पाहिजे. आपण हा विश्वास ठेवावयास हवा की शिशु हा अनंत शक्तीचे भांडार आहे. त्या सुप्त ब्रम्हाला जागृत करण्याइतकेच आपले प्रयत्न असावेत. अशा प्रकारचे शिक्षण मुलांना देण्यात आले तर ती खऱ्या अर्थाने मनुष्य बनतील आणि जीवन संग्रामात स्वत:च्या स्वत: येणाऱ्या संकटाचे निराकरण करतील. लहान मुलांना शिक्षण द्यायचे म्हणजे बुद्धी कशी वापरावी हे त्यांना दाखवायचे हात, पाय, कान, डोळे याचा उत्तम उपयोग कसा

करायचा हे त्यांना स्वतंत्रपणे सुचले की सगळे काम अगदी सोपे होते.

शिक्षण या जादूच्या शब्दाने सोडविली जाणार नाही अशी एकही समस्या नाही. खरे शिक्षण म्हणजे नुसते शब्द नव्हे, तर सर्व मानसिक शक्तीचा विकास करणे होय. असे म्हणता येईल की, शिक्षण म्हणजे व्यक्तींना अशा रीतीने वळण लावणे की जेणेकरून त्याला आपली इच्छाशक्ती चांगल्या गोष्टींकडे वळवू शकतील आणि त्या गोष्टी प्रत्यक्ष कृतीत आणू शकतील. शिक्षण म्हणजे प्रचलित पद्धतीचे मात्र नव्हे. ते शिक्षण भावात्मक व विधायक असले पाहिजे. नुसतीपुस्तकी विद्या उपयोगाची नाही. चारित्र्य घडविणारे, मानसिक बळ वाढवणारे, बुद्धी विशाल करणारे आणि स्वावलंबी बनविणारे असे शिक्षण हवे आहे. शिक्षण आणि संस्कृती ह्या गोष्टी संपूर्णपणे पुरुषांवर अवलंबून असतात. पुरुष सुसंस्कृत असल्यास स्त्रियाही तशाच असतातच. स्वाधीनते कधीच कोणत्याच प्रकारचा विकास होणे शक्य नाही. विकासासाठी पहिली आवश्यक गोष्ट असते स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, व उच्चार स्वातंत्र्य,ज्याप्रमाणे माणसाला अत्यावश्यक असते त्याचप्रमाणे जोवर त्याचे हातून इतरांचे अनिष्ट होत नाही तोवर त्याचा आहार, पेहराव, विवाह आदी सर्वच बाबतीत स्वतंत्र असायला हवे.

गरिबांना जे शिक्षण द्यावयाचे त्याचा पुष्कळसा भाग तोंडी शिकविला जावयास हवा. गरीब लोक अधिकांश शिक्षण कानांनी ऐकूनच घेतील, त्यासाठी त्यांच्यासाठी शाळा वगैरे काढण्याची वेळ अजून आलेली नाही. हळूहळू ह्या सर्व प्रमुख केंद्रांमध्ये शेतकी, व्यापार, उद्योगधंदे वगैरे शिक्षण दिले जाईल आणि या देशांमध्ये कलांची उन्नती व्हावी म्हणून तसल्या शाळा व कारखाने देखील काढण्यात येतील. आपण प्रत्येक खेड्यात मोफत शाळा उघडल्या तरीही गरीब मुले शिकावयास येणार नाहीत. आपले पोट भरण्यासाठी ती शेतावर कामे करण्यासाठी जातील. आपल्याजवळ मुबलक धनही आणि शिक्षण घेण्यासाठी या सर्व मुलांना शाळेत आणावयाचे नाही गरीब लोक जर शिक्षणा जवळ पोहोचू शकणार नाहीत तर शिक्षण आणि त्यांच्या नांगरजवळ, त्यांच्या कारखान्याजवळ वा जरूर तिथे कुठेही पोहोचले पाहिजे. गरीब लोक जर तुमच्याकडे येऊन शिक्षण घेऊ शकत नसतील तर तुम्ही त्यांच्याकडे जाऊन त्यांना शिक्षण दिले पाहिजे. गरीब लोक इतके निर्धन आहेत की ते शाळेमध्ये येऊ शकत नाही आणि अभ्यास केल्याने त्यांना काही लाभ होणार नाही.

स्वामीजींचा हा शिक्षण आदर्श स्वतंत्र भारताला प्रगतीपथावर घेऊन जाण्यास सर्वतोपरी मदत करेल आणि देशातील इतर विद्या प्राप्त करु इच्छिणाऱ्या लोकांना योग्य पदार्थ प्रदर्शन करेल.